जा.क्र. पोआ/ ३०१०/२०२०
पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड
दिनांक :- ०३/०५/२०२०

विषय :- **फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४(१)(३)प्रमाणे दिनांक ०४/०५/२०२० चे ००:०१ ते १७/०५/२०२० चे २४:०० वा.च्या जमावबंदी व वाहतुक मनाईबाबतचा सुधारीत आदेश. (पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीत पिंपरी चिंचवड महानगरपालीका हद्द व देहुरोड छावणी परिषद भाग वगळुन उर्वरीत भागासाठी)**

**सुधारीत आदेश -**

२) ज्या अर्थी जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणुमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणुन घोषीत केला आहे. तसेच कोरोना विषाणुचा प्रसार भारतात,महाराष्ट्रात, पिंपरी चिंचवड शहरात गतीने पसरत आहे, असे दिसुन येत आहे. राज्य शासनाने कोरोना विषाणु (कोवीड - १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथीचे रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३/०३/२०२० पासुन लागु करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केली आहे. व त्याबाबतची नियमावली तयार केली आहे. तसेच महाराष्ट्र शासन आदेश नं. डीएमयु/२०२०/सीआर.९२/डीआयएसएम-१ महाराष्ट्र शासन महसुल व वने, आपत्ती व्यवस्थापन,पुनवर्सन मंत्रालय दिनांक. ०२/०५/२०२० अन्वये कोव्हिड - १९ चे नियंत्रणासाठी राज्यात यापुर्वी जारी करण्यात आलेल्या लॉकडाऊन आदेशाची मुदत दि. १७/०५/२०२० अखेर वाढविली आहे. या पार्श्वभुमीवर या कार्यालयाकडुन पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात (**पिंपरी चिंचवड महानगरपालीका हद्द व देहुरोड छावणी परिषद भाग वगळुन उर्वरीत भागासाठी**) फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४(१)(३) प्रमाणे **दिनांक २८/०४/२०२० चे ०० :०१ ते ०३/०५/२०२० चे २४ :०० वा पर्यंत जमावबंदी आदेश अंमलात आहेत.** तसेच महाराष्ट्र शासन आदेश नं. डीएमयु/२०२०/सीआर.९२/डीआयएसएम-१ महाराष्ट्र शासन महसुल व वने, आपत्ती व्यवस्थापन,पुनवर्सन मंत्रालय दिनांक. ०२/०५/२०२० अन्वये अधिसुचना जारी करुन सुधारीत आदेशाव्दारे लॉकडाऊन आदेशाची मुदत दिनांक १७/०५/२०२० अखेर वाढविली आहे. आणि **संदर्भ महाराष्ट्र शासन नं. डीएमयु/२०२०/सीआर.९२/डीआयएसएम-०१ दिनांक ०२/०५/२०२० अन्वये सुधारीत मार्गदर्शक सुचना पारीत केल्या आहेत.**

३) भारत सरकार आरोग्य मंत्रालय, तसेच महाराष्ट्र सरकार आरोग्य मंत्रालय यांनी कोरोनाग्रस्त रुग्णांचे संपर्कात लोकांनी येवु नये, अशा मार्गदर्शक सुचना पारित केल्या आहेत. त्यासाठी नागरिकांना नियंत्रित करणे व त्यांच्या हालचालींना प्रतिबंध करणे आवश्यक बनले आहे. यास्तव **सार्वजनिक किंवा खाजगी जागेत पाच किंवा पाच पेक्षा अधिक व्यक्तींनी एकत्र येणे थांबणे किंवा चर्चा करणे,** तसेच कार्यक्रमाचे आयोजन केल्यास या विषाणुंचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता सर्वसामान्य जनतेस व त्यांचे आरोग्यास धोकादायक होत असल्याची माझी खात्री झालेली आहे. त्याकरिता तात्काळ प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. अशी उपाययोजना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १४४ खालील तरतुदींच्या अनुषंगाने जनतेस व खालील व्यक्तीस आणि आस्थापना यांना उद्देशुन काढणे आवश्यक असलेबाबत माझी खात्री झालेली आहे.

४) त्याअर्थी मी **संदीप बिष्णोई, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड,** तथा विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणुन शासनाच्या दिनांक ०१/०४/१९७४ चे अधिसुचनेव्दारे प्राधिकृत अधिकारी म्हणुन पिंपरी चिंचवड महानगरपालिका व देहुरोड कॅन्टोंमेंट बोर्ड हद्दीबाहेरील व मुळशी, हवेली, मावळ, खेड तालुक्यातील, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीत येणारी गावे, तसेच तळेगाव दाभाडे नगरपालिका, आळंदी नगरपालिका, चाकण नगरपालिका, यांच्या संपूर्ण हद्दीत आणि पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीतील हिंजवडी, देहुरोड, तळेगाव दाभाडे, शिरगाव पोलीस चौकी, तळेगाव

Scanned by CamScanner

एमआयडीसी, चाकण, म्हाळुंगे पोलीस चौकी, आळंदी, दिघी पोलीस ठाण्यांच्या क्षेत्रात येणा-या वर नमुद सर्व पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रास फौजदारी प्रकिया संहिता कलम १४४ (१)(३) अन्वये मनाई आदेश परिच्छेद क्रमांक ५ मधील नमुद अधिसुचनांच्या अधीन राहुन **फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४ (१) (३) प्रमाणे दिनांक ०४/०५/२०२० चे ००:०१ ते दिनांक १७/०५/२०२० चे २४:०० वा. पर्यंत सुधारीत जमावबंदी व वाहतुक मनाई आदेश लागु करीत आहे.**

**५) सदरचा मनाई आदेश खालील बाबतीत लागु होणार आहे. (संदर्भ महाराष्ट्र शासन नं. डीएमयु/२०२०/सीआर.९२/ डीआयएसएम-०१ दिनांक ०२/०५/२०२० अन्वये सुधारीत मार्गदर्शक सुचना)**

**अ)** पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे वर नमुद कार्यक्षेत्रातील सर्व सार्वजनिक वाहतुक त्यामध्ये हवाई वाहतुक, सर्व पॅसेंजर रेल्वे गाडया (सुरक्षेच्या उद्देशाने धावणा-या रेल्वे गाडया वगळुन), आंतरराज्य व राज्यांतर्गत सर्व वैदयकीय व पशुवैदयकीय व्यवसायाशी संबंधीत कर्मचारी, नर्सेस, लॅबटेक्नीशीयन, पॅरामेडीकल स्टाफ, रुग्णवाहीका व हॉस्पीटलशी संबंधीत सर्व सेवांची वाहतुक वगळुन

**ब)** व्यक्तीना आंतरराज्य प्रवास करण्यास मनाई राहील तथापी वैदयकीय कारणांस्तव व गृह विभागाने परवानगीदिलेल्या व्यक्तींना प्रवास करता येईल.

**क)** सर्व प्रकारचे शैक्षणिक, प्रशिक्षण, शैक्षणिक संस्था शाळा, महाविदयालये बंद राहतील. तथापी ऑनलाईन/दुर शिक्षण यांना परवानगीदेता येईल.

**ड)** आदरातिथ्य सेवा (Hospitality Services) (गृह मंत्रालय भारत सरकार, यांनी सवलती दिलेल्या सेवा वगळुन)

**इ)** सर्व सिनेमागृहे, मॉल्स, शॉपींग कॉप्लेक्स, व्यायामशाळा/जिम्नॅशियम, क्रीडांगणे/ स्पोर्टस् कॉम्लेक्स, जलतरण तलाव, करमणुक उदयाने, चित्रपटगृहे, बार आणि सभागृहे, असेंब्ली हॉल आणि तत्सम ठिकाणे

**फ)** सर्व प्रकारचे सामाजिक/राजकीय/ क्रिडा/मनोरंजन/ शैक्षणिक/ सांस्कृतिक/ धार्मिक कार्यक्रम व इतर मेळावे

**ग)** सर्व धार्मिक स्थळे/प्रार्थना स्थळे नागरीकांसाठी बंद ठेवली जातील. धार्मिक कार्यक्रम/मेळावे/प्रवचने इ. करीता एकत्र येण्यास सक्त मनाई आहे.

**ह)** अंत्यसंस्कारासाठी २० पेक्षा जास्त व्यक्तींना परवानगी नाही.

**य)** आंतरराज्यीय सार्वजनीक वाहतुक व्यवस्थेस परवानगीनाही (गृहविभागाने परवानगीदिलेले वाहने वगळुन)

**ज)** मेट्रो रेल्वे सुविधा बंद राहील.

**ल)** आंतरजिल्हा व आंतरराज्यीय बस वाहतुकीस मनाई करण्यात आली आहे. (गृह मंत्रालय भारत सरकार, यांनी सवलती दिलेल्या सेवा वगळुन)

म) ऑटो रिक्षा,सायकल रिक्षा,टॅक्सी व कॅब सेवा बंद राहतील

**न)** आंतरजिल्हा व जिल्हा अंतर्गत बस वाहतुक बंद राहतील

**ओ)** केशकर्तनालय,स्पा व सलुन बंद राहतील.

**६) नागरींकाची सुरक्षा व सोईसाठीच्या उपाययोजना**

अ) अत्यांवश्यक सेवा खेरीज नागरीकांना सायंकाळी ०७/०० ते सकाळी ०७/०० पर्यंत बाहेर पडण्यास मनाई राहील.

ब) ६५ वर्षे वयोगटातील वृध्द,विकलांग, गरोदर महिला व १० वर्ष वयाखालील मुले यांनी जिवनावश्यक व वैद्यकिय गरजे व्यतीरीक्त घराबाहेर पडु नये.

Scanned by CamScanner

**७) सदरचे आदेश खालील बाबतीत लागु होणार नाहीत-**

**अ) व्यक्तींची वाहतुक -**

- अत्यावश्यक सेवेतील खाजगी वाहने, वैदयकीय/पशुवैदयकीय सेवा व जीवनावश्यक माल वाहतुकीची वाहने.

- परवानगीदिलेल्या कामासंठी व्यक्ती व वाहनांना ये-जा करण्यास मुभा राहील.मात्र **चार चाकी वाहनात १ चालकासह फक्त २ प्रवासी पाठीमागील सीटवर तसेच दुचाकीवर फक्त १ चालकास परवानगी राहील.**

**खालील नमुद सर्व आस्थापना/प्रकल्प/कार्यालये सकाळी ०७/०० ते संध्याकाळी ०७/०० या वेळेतच चालु राहतील.**

**ब) औदयोगीक आस्थापना सुरु ठेवणे बाबत -**

१) शहरी भागातील (पिंपरी चिंचवड महानगरपालीका/देहुरोड छावणी परिषद हद्दी बाहेरील) विशेष आर्थिक क्षेत्रातील (SEZ) मॅन्युफॅक्चरींग युनिट व निर्यात देणारे युनिट (EOU).औदयोगीक वसाहती व उदयोगनगरे,जिवनावश्यक वस्तु, औषधे, फार्मास्युटीकल, वैदयकीय उपकरणे यांचे मॅन्युफॅक्चरींग युनिटस्, कच्चा माल व मध्यस्थ,सर्व प्रकारचे कृषी/ फलोत्पादन / कृषी प्रक्रीया/ पॅकेजिंग व वाहतुक,सतत प्रक्रीया आवश्यक असलेले उत्पादन युनिट्स व पुरवठा साखळी,आय टी हार्डवेअर मॅन्युफॅक्चर युनीट (शीफ्टमध्ये व सामाजिक अंतर ठेवुन), पॅकेजींग मटेरीयलचे मॅन्युफॅक्चरींग युनिट सुरु राहतील

२) **ग्रामिण भागातील सर्व औद्योगीक अस्थापना/उपक्रम सुरु राहतील.**

वरील १ व २ मधिल मध्ये नमुद असलेल्या अस्थापना मधील अधिकारी व कर्मचारी निश्चित केलेल्या वाहनातुन (Dedicated Vehicle) सामाजिक अंतर राखुन ने आण करलील.

**क) बांधकाम प्रकल्प**

- शहरी (पिंपरी चिंचवड महानगरपालीका/देहुरोड छावणी परिषद हद्दी बाहेरील) व ग्रामिण हद्दीतील बांधकाम प्रकल्प सुरु राहतील परंतु त्याठिकाणी बांधकामावर आसलेले कामगार,पर्यावेक्षक,विवीध यंत्रचालक यांना येण्याजाण्यासठी सार्वजनिक वाहतुक व्यवस्थेचा वापर करता येणार नाही यासर्वांची राहण्याची व्यवस्था कामाच्याच ठिकाणी करण्यात यावी.

**ड) खाजगी कार्यालय (IT/ITES कंपन्यासह)**

- सर्व खाजगी कार्यालये **(IT/ITES कंपन्यासह)** हे ३३ टक्के मनुष्यबळासह सामाजिक अंतर राखुन कार्यान्वीत राहतील. त्यामधील अधिकारी व कर्मचारी हे निश्चित केलेल्या बसमधुनच (Dedicated Vehicle) प्रवास करतील.त्यांचे उर्वरीत कर्मचारी हे **'वर्क फ्रॉम होम'** पध्दतीने काम करतील.

**इ) सर्व औद्योगीक अस्थापना(कंपन्या), बांधकाम क्षेत्र, खाजगी कार्यालय (IT/ITES कंपन्यासह) मधील कार्यरत अधिकारी/कर्मचारी/कामगार हे कार्यरत असलेल्या ठिकाणाचे पोलीस स्टेशन कडुन अथवा जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडुन पासेस घेतील.**

फ) नगरपालीका क्षेत्रातील सर्व प्रकारचे मॉल,बाजार समुह (मार्केट कॉम्प्लेक्स) बंद राहतील मात्र त्यातील अत्यावश्यक वस्तु विक्रीची दुकाने चालु राहतील.

ग) शहरी भागातील (पिंपरी चिंचवड महानगरपालीका/देहुरोड छावणी परिषद हद्दी बाहेरील) जिवनावश्यक माल/वस्तुची दुकाने व जिवनावश्यक वस्तु/माल नसलेली सर्व स्वतंत्र दुकाने (Single Shop) रेसीडेन्शीयल कॉम्प्लेक्स मधील दुकाने तसेच शेजारील (कॉलनीमधील) दुकाने चालु

Scanned by CamScanner

राहतील. स्वतंत्र दुकाने (सींगल शॉप) शेजारील कॉलनीतील दुकाने त्यासाठी एका गल्लीतील फक्त पाच दुकांनांनाच अत्यावश्यक असलेल्या व अत्यावश्यक नसलेल्या अश्या दोन्ही प्रकारच्या माल विक्री करण्याची परवानगी आहे. परंतु पाच पेक्षा जास्त दुकाने असतील तर, तेव्हा केवळ पाच अत्यावश्यक मालाची विक्री करणाऱ्या दुकांनांना परवानगी राहील. सर्व ठिकाणी सामाजिक अंतर पाळले पाहिजे.

ह) ग्रामिण भागातील सर्व प्रकारची दुकाने (मॉल वगळुन) सकाळी ०७/०० ते संध्याकाळी ०७/०० पर्यंत चालु राहतील. मात्र त्यांनी सामाजिक अंतराचे पालन केले पाहीजे.

ई) अत्यावश्यक वस्तु,औषधे व वैद्यकिय उपकरणे यांचा पुरवठा करणाऱ्या **इ-कॉमर्स** कंपन्या आवश्यक पुर्व परवाणगीसह चालु राहतील.

**८) मद्य विक्रीबाबत**

**शहरी व ग्रामिण भागातील मद्यविक्रीची अस्थापना चालु राहतील (राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या आदेश क्र. एफएलआर/१०२०/कोव्हीड-१९/सात- मुंबई दि. ३ मे २०२० चे अटी व शर्ती नुसार)**

**९) सरकारी कार्यालये**

- सर्व शासकिय अधीनस्त इतर मंत्रालये/कार्यालये/खाती/विभाग, उपसचिव व उपसचिव पदावरील उपस्थिती १०० टक्के राहील इतर अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती ३३ टक्के राहील
- त्यामध्ये संरक्षण, मध्यवर्ती सशस्त्र पोलीस दल, आरोग्य व कुटुंब कल्याण, आपत्ती व्यवस्थापन आणि जलद कृती दल, राष्ट्रीय माहिती केंद्रे, भारतीय खादय महामंडळ तसेच राष्ट्रीय सिसमॉलॉजी सेंटर, एनसीसी, नेहरु युवा केंद्र, नागरी सेवा आणि कस्टम्स हे कोणत्याही शर्ती शिवाय सुरु राहतील

**१०) मान्सुनपुर्व (Pre Monsoon) कामासंदर्भात**

**अर्धवट स्थितीतील जोत्याचे बांधकाम/बेसमेंट बांधकाम,संरक्षक भिंत बांधकाम, भस्खलन प्रतिबंधक बांधकाम, आजुबाजुच्या इमारती,रस्ते यांना पाणी साचुन धोकादायक ठरु शकतील अशी अर्धवट स्थितीतील भरावांची कामे, मेट्रो प्रकल्पाची कामे संबधीत विभागाच्या परवानगीने चालु राहतील.**

**११) राज्याशासनाकडुन अटी व शर्तीसह वेळोवेळी देण्यात आलेल्या परवानग्या यापुढेही लागु राहतील.**

**टीप :-**

1) वरील नमुद सर्व सवलत दिलेले संबंधित अधिकारी कर्मचारी खाजगी व्यक्ती यांनी त्यांचे नेमणुकीचे आदेश ओळखपत्र याबाबतचा पुरावा सोबत बाळगणे बंधनकारक आहे.
2)वर नमुद आस्थापना व इतर ठिकाणी कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी आरोग्य विभागाकडुन देण्यात आलेल्या आवश्यक त्या सर्व प्रतिबंधात्मक उपाययोजना तसेच सामाजिक अंतर ठेवण्याबाबतच्या उपाययोजना तसेच चेह-यावर मास्क परिधान करणे आणि सामाजिक अंतर ठेवण्याबाबत उपाययोजनांची दक्षता संबधीत कार्यालये, दुकान, आस्थापना यांचे चालक मालक,कार्यालय प्रमुख व्यवस्थापक यांनी घ्यावी.
3) सार्वजनिक ठिकाणाच्या संस्था/संस्थेचे व्यवस्थापक यांनी सार्वजनिक ठिकाणी ५ किंवा ५ पेक्षा जास्तव्यक्ती एकत्र येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.
4) कामाच्या ठिकाणी व सार्वजनिक ठिकाणी मास्क परिधान करणे अनिवार्य राहील.
5) सार्वजनिक ठिकाणाचे प्रमुख, कामाच्या ठिकाणाचे प्रमुख व वाहतुकीचे प्रमुख यांनी सामाजिक अंतर पाळले जाईल याची खात्री करावी.

Scanned by CamScanner

6) सार्वजनिक ठिकाणी थुंकणारी व्यक्ती दंडास पात्र राहील.

7) गुटका, तंबाखु व तंबाखुजन्य पदार्थ विक्रीस मनाई राहील

१२) सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती व संस्था भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ प्रमाणे व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम ५१ ते ६० नुसार आणि साथीचे रोग कायदा १८९७ तसेच प्रचलीत कायदयांतील तरतुदींनुसार शिक्षेस पात्र राहील.

१३) उपरोक्त ठिकाणी/कार्यक्रम येथील संबंधित संयोजक तसेच आस्थापना मालक/ चालक/ व्यवस्थापक यांना प्रत्येकास आदेशापुर्वी स्वतंत्र नोटीस बजावणी शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहिती प्रसार माध्यमे, पोलीस स्टेशन, सहाय्यक पोलीस आयुक्त, तसेच परिमंडळीय पोलीस उप आयुक्त कार्यालये यांचे नोटीस बोर्डवर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

**सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्यानिशी आज दिनांक ०३.०५.२०२० रोजी दिलेला आहे**

(संदीप बिष्णोई)
पोलीस आयुक्त,
पिंपरी चिंचवड

**ठिकाण :-** पिंपरी चिंचवड
**दिनांक :-** ०३.०५.२०२०

Scanned by CamScanner